RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ११(२)] शुक्रवार, जानेवारी २८, २०२२/माघ ८, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह (परिवहन) विभाग

२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ जानेवारी २०२२.

अधिसूचना

**महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, १९५८.**

क्रमांक एमव्हीडी-०६२०/प्र.क्र.७२/परि-३.– ज्याअर्थी, कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावामुळे केंद्र शासनाने दि. २५ मार्च, २०२० पासून संपूर्ण देशभर टाळेबंदी लागू केली आणि महाराष्ट्र राज्यात नोंदणीकृत झालेल्या आणि वार्षिक कर भरणा करणाऱ्या परिवहन वाहनांना, ज्यांनी ३१ मार्च, २०२० पर्यंतचा कर भरणे आवश्यक होते, अशा स्कूल बस / वाहनांच्या मालकांना दिलासा देणे आवश्यक होते ;

आणि ज्याअर्थी, अधिसूचना क्र. एमव्हीडी-०६२०/ प्र.क्र.७२/परि-३, दि. १५ सप्टेंबर, २०२० अन्वये शालेय विद्यार्थी वाहतूक बस/ वाहनांना दि. १ एप्रिल, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२१ या कालावधीचा वार्षिक कराच्या ५० टक्के करामध्ये सूट दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, शालेय प्राधिकरणाच्या मालकीच्या, शालेय प्राधिकरणाने कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या आणि केवळ स्कूल बस म्हणून वापरण्यात येणाऱ्या आणि केवळ शाळेतील मुलांची ने-आण करण्यासाठी शालेय प्राधिकरणाव्यतिरिक्त इतरांची मालकी असलेल्या किंवा कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या स्कूल बसेसना वार्षिक करातून सूट देणे शासनास इष्ट वाटते ;

त्याअर्थी, महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियमाच्या (१९५८ चा ६५) कलम १३ चे उप कलम (२) मधील तरतुदीन्वये दिलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन, खालील नमूद वाहनांना दि. १ एप्रिल, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२२ या कालावधीत १००% करामध्ये सूट देत आहे :–

(अ) शालेय प्राधिकरणाच्या मालकीच्या आणि केवळ स्कूल बस म्हणून वापरण्यात येणाऱ्या स्कूल बस.

(ब) शालेय प्राधिकरणाने कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या आणि केवळ स्कूल बस म्हणून वापरण्यात येणाऱ्या स्कूल बस.

(क) केवळ शाळेतील मुलांची ने-आण करण्यासाठी शालेय प्राधिकरणाव्यतिरिक्त इतरांची मालकी असलेल्या किंवा कंत्राटी पद्धतीने घेतलेल्या स्कूल बस.

तथापि, ज्या उपरोक्त अ, ब, क, येथे नमूद स्कूल बस प्रकारातील वाहनांनी उपरोक्त कालावधीसाठीचा कर भरलेला असेल तर अशा कराचे महाराष्ट्र मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ मधील कलम ९ (४A) नुसार आगामी काळात समायोजन करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. मो. होळकर,**
शासनाचे सहसचिव.

## HOME (TRANSPORT) DEPARTMENT

2nd Floor, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, dated the 28th January 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA MOTOR VEHICLES TAX ACT, 1958.

No. MVD-0620/CR-72/Tra-3.— Whereas, in view of the nationwide lockdown imposed by the Central Government due to spread of Covid-19 Virus from the 25th March, 2020 it was considered necessary to take certain measures to give relief to transport vehicles owners whose vehicles are registered in the State of Maharashtra and are paying annual tax ;

And whereas, the Government of Maharashtra has, *vide* Government Notification, Home Department, No.MVD-0620/CR-72/Tra-3, dated 15th of September 2020, exempted said vehicles from the payment of 50% of annual tax for a period of 1st April 2020 to 31st March 2021 ;

And whereas the Government considered it expedient to exempt totally, the school bus, owned by school authorities, taken on contract by school authorities and owned or taken on contract by other than school authorities to transport exclusively school children to and from school, from payment of annual tax ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*2*) of section 13 of the Maharashtra Motor Vehicles Tax Act (LXV of 1958), the Government of Maharashtra hereby exempts totally, from the payment of annual tax levied under the said Act, for the period 1st April, 2020 to 31st March 2022 to the following class of school buses.

(*a*) School buses owned by school authorities and used for exclusively as school buses.

(*b*) School buses taken on contract by school authorities and used for exclusively as school buses.

(*c*) School buses owned or taken on contract by other than school authorities to transport exclusively school children to and from school.

However, as per provision of sub-section (*4A*) of section 9 of Maharashtra Motor Vehicles Tax Act, 1958, if any of the school bus vehicles mentioned in above (a), (b), (c), have paid motor vehicle tax for above period, the same shall be appropriated towards payment of tax for future period.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. M. HOLKAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.